झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/१२८/२०२२
दिनांक :३१ / ०१ /२०२२.

## "जाहिर नोटीस"

**(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.१४१ पै, १५१पै, स.नं.३६ पै, सि.स.नं.५९९३ पै, ५९९६पै, ५९९९पै, ६०००पै, ६००१पै व ६००६ पै, लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुर्ण झोपडपट्टीचे क्षेत्रफळ २३७४८.२५ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.गोयलगंगा प्रमोटर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे; आणि

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व एकूण २३७४८.२५ चौ.मी. क्षेत्र अघोषित असलेने तसेच सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, झोपटपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडील झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अहवाल प्राप्त असलेने, सदरचे एकूण २३७४८.२५ चौ.मी. एवढे योजनाक्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदर क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये दि.०५/१०/२०१७ रोजीच्या आदेशाद्वारे **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १२ ते १८ ऑक्टोबर, २०१७ पृष्ठ क्र. ७ वर प्रसिध्द करणेत आलेला आहे.

ज्याअर्थी, दि.०५/१०/२०१७ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेशामध्ये योजनाक्षेत्राच्या चतु:सिमा चुकीच्या दर्शविल्या गेल्या असलेने त्यामध्ये आता खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या

स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील " असे नमूद केले आहे.

आणि ज्याअर्थी, या नोटीसाद्वारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे.

त्याअर्थी, या अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकारी क्र.३ यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.१४१ पै, १५१पै, स.नं.३६ पै, सि.स.नं.५९९३ पै, ५९९६पै, ५९९९पै, ६०००पै, ६००१पै व ६००६ पै, लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी, पुणे

महानगरपालिकेचे नाव :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अनुसूची

| गाव | सि.स.नं. | क्षेत्र (चौ. मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| मोरवाडी पिंपरी | स.नं.१४१ पै, १५१ पै, स.नं. ३६ पै, सि.स.नं. ५९९३ पै, ५९९६पै, ५९९९पै, ६०००पै, ६००१ पै व ६००६ पै, | २३७४८.२५ चौ. मी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व पिंपरी चिंचवड मनपा | पुर्वेस - लागू नाला<br>पश्चिमेस - लागू रस्ता<br>दक्षिणेस - स.नं.१५१ पै व सि.स.नं.५९९३ पै, ५९९६ पै, ५९९९ पै , ६००० पै.<br>उत्तरेस - लागू स.नं.१४१ पै, स.नं.३६ पै, सि.स.नं. ६००१पै, ६००६ पै | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

दिनांक :-३१/०१/२०२२.

31.12.22

(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :-

१. प्रादेशिक अधिकारी क्र१, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेबनगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९ :- यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव सादर
२. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.